दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १७५ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार, दि.२९ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोशा (रोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

पवार कुटुंब एकत्र यायला पाहिजे : तसे झाले तर मला आनंदच आहे-छगन भुजबळ

नाशिक (वृत्तसंस्था)–महाराष्ट्रात सध्या राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्याचसोबत पवार कुटुंब देखील एकत्र येणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी देखील पवार कुटुंबीयांनी एकत्र यावे असे आवाहन केले होते. याला खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला होता. यावर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार छगन भुजबळ यांनी मोठे विधान केले आहे.छगन भुजबळ म्हणाले, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे लहानपणापासून एकत्र आहेत. आऊ साहेब आणि बाळासाहेब ठाकरे राजावर सर्वात जास्त प्रेम करत होते. राजा म्हणजे राज ठाकरे. पण राजकारणामुळे थोडी दरी झाली. सर्व घराण्यांनी एकत्र यावे. पवार कुटुंब पण एकत्र यायला पाहिजे. तसे झाले तर मला त्याचा आनंदच होईल.



दरम्यान, सध्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे अजित पवारांच्या गटात येणार असल्याची चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वी जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यात भेट व चर्चा देखील झाली होती. यावर सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पोटातले पाणी हलू न देणे ही जयंत पाटील यांची खासियात आहे. १९९० पासून ते प्रबळपणे काम करतात. त्यांच्या मनातील फारसे कोणाला कधी कळले नाही. विधिमंडळात आमची सहज भेट झाली होती, दीर्घकाळ आमचा राजकीय प्रवास सोबत झाल्यामुळे मैत्री आहे.

दरम्यान, अजित पवार यांनी सभेत बोलताना मी अडीच वर्षांनी नव्या लोकांना मंत्रिपद देण्याचे सांगितले होते. मी माझा शब्द पूर्ण करणार, असे विधान केले होते. त्यामुळे आता कोणाला मंत्रिपद दिले जाते याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. यात छगन भुजबळ हे मंत्रिपद न मिळाल्याने नाराज होते. आता त्यांना संधी दिली जाण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे. या सगळ्यावर छगन भुजबळ यांना प्रश्न विचारण्यात आला असता ते म्हणाले, मी काय करू, अजित पवार यांनी ते विधान केले आहे, तर ते बघटिल. याबाबत त्यांनाच विचारा, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी दिली आहे.

शिक्षण आणि प्रेमाच्या बळावर बौद्धिक दिव्यांग मुलांचे भविष्य उज्वल करा-आ.किशोर जोरगेवार

स्विकार दुर्बल मनस्कर शाळेत मार्गदर्शन शिबिर आणि बस लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन

चंद्रपूर । प्रतिनिधी

आपल्या समाजातील प्रत्येक व्यक्तीला हक्काचे स्थान मिळाले पाहिजे. बौद्धिक दिव्यांग मुले ही आपल्या समाजाचा अविभाज्य घटक आहेत. त्यांच्या आयुष्यात आनंद, आत्मसन्मान आणि स्वतंत्रतेची भावना निर्माण करणे, ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने हातात हात घालून या कार्यात सहभागी होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

श्री साई मतिमंद शिक्षण संस्था, चंद्रपूर द्वारा संचालित स्विकार दुर्बल मनस्कर (मतिमंद) मुलांची निवास शाळा, ताडाळी येथे मार्गदर्शन शिबिर आणि बस लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या



कार्यक्रमाला रेखाजाई पिंपळशेंडे, ॲड. अभय पाचपोर, समाजकल्याण विभागाचे उपयुक्त राजेशजी पांडे, डॉ. दिलीप चौधरी, शाश्वत शेरे, शेरे, नंदकुमार फुले, जैन, मुधोळकर, वैभव सनास्कर, नलगंटिवार, अमोल मारुतकर आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, श्री साई मतिमंद शिक्षण संस्था ज्या प्रकारे या मुलांच्या विकासासाठी कार्यरत आहे, हे अत्यंत कौतुकास्पद आहे. केवळ शिक्षणच नव्हे, तर प्रेम, सहकार्य आणि योग्य दिशा या मुलांसाठी येथे दिली जात आहे. आजच्या या कार्यक्रमात नव्या बसचे लोकार्पण करण्यात आले आहे. ही बस या मुलांसाठी केवळ वाहतुकीचे साधन नसून त्यांच्या स्वप्नांना गती देणारे साधन ठरेल. शिक्षणाचा आणि विकासाचा हा प्रवास अधिक सुलभ व सुरक्षित व्हावा यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू.

या मुलांसाठी केवळ भौतिक सुविधा पुरवणे पुरेसे नाही, तर त्यांना प्रेमाने, मायेने समजून घेऊन जगण्याची संधी देणे आवश्यक आहे. आम्हीही येथे आवश्यक त्या सर्व मदतीसाठी कटिबद्ध आहोत. ही मुले समाजाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांना वेगळे न मानता, त्यांच्या गरजांनुसार विशेष प्रेम, काळजी आणि संधी देणे, ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे असे आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

संजय गायकवाड माफी मागतात,प्रशांत बंब का नाही?

शिक्षक भारती सोलापूरची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

सोलापूर । प्रतिनिधी

गृह खात्याच्या महाराष्ट्र पोलिसांविषयी वादग्रस्त विधान केल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांना तातडीने पोलिसांची माफी मागायला लावली. ही कारवाई जशी स्तुत्य आहे, तशीच शिक्षण खात्याशी संबंधित शिक्षकांविषयी अवमानकारक विधाने करणाऱ्या भाजपचे आमदार प्रशांत बंब यांच्याबाबतही तत्काळ कारवाई व्हावी, अशी ठाम मागणी शिक्षक भारती सोलापूरने मुख्यमंत्र्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.


शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी सांगितले की, आमदार प्रशांत बंब सातत्याने जिल्हा परिषद तसेच खासगी अनुदानित शाळांतील शिक्षकांविषयी अवहेलनात्मक विधाने करीत आहेत. त्यांच्या विधानांमुळे संपूर्ण शिक्षक वर्गात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असून, त्यांच्या सन्मानावर झालेला आघात म्हणजे संपूर्ण शिक्षण क्षेत्राची बदनामी असल्याचे ते म्हणाले.मुख्यमंत्र्यांनी संजय गायकवाड यांच्याकडून पोलिसांची माफी मागवून घेतली, तसेच तातडीने प्रशांत बंब यांनाही समज द्यावी आणि महाराष्ट्रातील शिक्षकांची जाहीर माफी मागायला लावावी, अशी शिक्षक भारतीने जोरदार मागणी केली आहे. अन्यथा शिक्षकांमध्ये सरकारविषयी तीव्र असंतोष उफाळेल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

बंब यांचेकडून शिक्षकांचा होणारा अवमान म्हणजे संपूर्ण शिक्षण क्षेत्राचा अपमान आहे. पोलिस दलाच्या सन्मानासाठी सरकारने तातडीने पावले उचलली, तशीच शिक्षकांच्या सन्मानासाठीही गंभीर दखल घ्यावी. आमदार प्रशांत बंब यांनी तातडीने शिक्षकांची जाहीर माफी मागावी. गृह विभाग व शिक्षण विभागाच्या सन्मानात भेदभाव करू नये, अन्यथा शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी उसळेल.
–विजयकुमार गुंड,शिक्षक भारती जिल्हा प्रवक्ता

वैजापूरात फार्मर्स कंपनीची सहा लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक

वैजापूर । अर्जुन शिंदे

वैजापूर येथील वैजापूर फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या मका खरेदी-विक्री केंद्रातून तब्बल ६ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संचालक रामकृष्ण शेषराव तुपे यांच्या तक्रारीवरून बाळासाहेब बाबुराव गायकवाड (रा. नांदगाव, ता. वैजापूर) यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. वैजापूर फार्मर्स प्रोड्युसर कंपनी ही केंद्र सरकारच्या कॉर्पोरेट मंत्रालयाकडे नोंदणीकृत संस्था आहे. कंपनी शेतकऱ्यांकडून शेतीमाल खरेदी करून त्यावर प्रक्रिया करते व बाजारभाव वाढल्यावर विक्री करून नफा शेतकऱ्यांमध्ये वाटते. १० नोव्हेंबर २०२३ रोजी संचालक मंडळाच्या बैठकीत नांदगाव येथे मंगला बाळासाहेब गायकवाड यांच्या जागेवर विनामूल्य मका खरेदी केंद्र सुरू



करण्याचा निर्णय घेण्यात आला. आवश्यक साहित्य जसे की ताडपत्री, वजन काटा, आर्द्रता मशीन इत्यादी बाळासाहेब गायकवाड यांच्या ताब्यात देण्यात आले होते.

३१ डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत या केंद्रावर मका खरेदी करण्यात आली. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णा चांदोडकर यांनी केलेल्या लेखापरीक्षणात गंभीर वित्तीय अनियमितता आढळली. रेकॉर्डनुसार २ लाख ५८ हजार ५२५ रुपयांचा मका शिल्लक दाखवला असताना प्रत्यक्षात माल गायब आढळला. तसेच, काळे मगर ट्रेडिंग कंपनीकडून खरेदीसाठी दिलेल्या ३ लाख ६९ हजार ८२६ रुपयांची थकबाकीही न भरल्याचे ऑडिटमध्ये स्पष्ट झाले.

त्यानंतर संचालक मंडळाने बाळासाहेब गायकवाड यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांनी केवळ ७० हजार रुपये परत केले असून, ७२ हजार ४८७ रुपयांचे साहित्य अद्याप कंपनीला न परत केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

हा प्रकार उघड झाल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी स्थापन झालेल्या संस्थेमध्ये असा प्रकार घडल्याने फसवणूक झाल्याची भावना निर्माण झाली आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून, लवकरच अधिक तपशील उजेडात येण्याची शक्यता आहे.

रावेर एमआयडीसीसाठी दोन हजार एकर जागा देणार–ना.बावनकुळे

'जे आम्हाला तीन वर्षांत जमले नाही, ते अनुपने सहा महिन्यांत करुन दाखविले', ना.बावनकुळेंकडून आमदार अग्रवालांवर स्तुतीसुमने

धुळे । उमाकांत अहिरराव

धुळे जिल्ह्यातील अवधान एमआयडीसीत 'ग्रोईंग धुळे उद्योग समिट'मध्ये सोमवारी ८ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार (करण्यात आले. यामुळे शेकडो तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.या समारंभात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, धुळे जिल्ह्यात उद्योगासाठी पोषक वातावरण आहे. आमदार अनुप अग्रवाल यांनी केवळ सहा महिन्यांत एमआयडीसीशी संबंधित प्रश्न मार्गी लावले, जे आम्हाला तीन वर्षांतही शक्य झाले नव्हते.

ना. बावनकुळे यांनी उद्योजकांना सुरक्षिततेचा विश्वास दिला आणि उद्योजकांना त्रास



देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला. रावेर येथे २ हजार एकर जमीन उद्योगांसाठी उपलब्ध करून देण्याचेही त्यांनी जाहीर केले.

समिटमध्ये पालकमंत्री जयकुमार रावल, आ. अनुप अग्रवाल, प्रदेश महामंत्री विजय चौधरी, माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, आमदार काशिराम पावरा, आ. मंजुळाताई गावित, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, एसपी श्रीकांत धिवरे यांच्यासह मोठ्या प्रमाणात उद्योजक उपस्थित होते.ना. बावनकुळे यांनी धुळे जिल्ह्याच्या भूमीला वंदन करत विकसित भारत २०४७ या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीसाठी या उद्योग करारांचा मोठा हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त केला.

पाथरी येथील साईबाबा विकास आराखडास वाढीव निधी मंजूर करणार आ.राजेश विटेकर यांना दिली जबाबदारी–उपमुख्यमंत्री अजित पवार

परभणी । प्रतिनिधी

पाथरी येथील साईबाबा मंदिराच्या विकास आराखड्यासाठी उपमुख्यमंत्री आणि वित्त व नियोजन मंत्री अजित दादा पवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेल्या बैठकीत वाढीव निधी मंजूर करण्याची घोषणा केली. तसेच, नवीन विकास आराखडा पूर्ण होईपर्यंत त्याचा पाठपुरावा स्थानिक आमदार आ. राजेश विटेकर यांच्याकडे सोपविण्याचे आदेशही दिले.

यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी पाथरी येथील विकास आराखड्याबाबत नाराजी व्यक्त केली. हा आराखडा अत्यंत छोट्या स्वरूपात आहे आणि ज्याने कधीही मोठ्या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्याचा अनुभव घेतला नाही, अशा व्यक्तीने हा आराखडा तयार केला आहे. पंढरपूर, शेगाव, माहूर यांसारख्या देवस्थानांचे आराखडे तयार करणाऱ्या व्यक्तीकडून हे आराखडे तयार करण्यात येणार आहेत,असे ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री पवार यांनी नगरपरिषदेने निवडलेल्या सल्लागारांना बदलण्याचे निर्देश दिले आणि ते पुढे म्हणाले की, सद्यस्थितीत भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे, पण प्रत्यक्ष विकासकामे अजून सुरू झालेली नाहीत. आराखडा दर्जेदार आणि भव्य असावा, त्यासाठी अधिक निधी लागेल, पण मी निधी देण्यासाठी तयार आहे. काम नियोजन विभागाचे आहे, म्हणून मला त्या विभागाचा मंत्री असल्याने कितीही निधी लागला तरी मी देण्यास तयार आहे, असे पवार यांनी सांगितले.

तसेच, त्यांनी आ. राजेश विटेकर यांना तुम्ही लक्ष द्या, महाराष्ट्रातील मोठ्या देवस्थानाप्रमाणे पाथरी येथील साईबाबा मंदिर व शहराचा विकास करणे ही तुमची जबाबदारी आहे आणि मी ही जबाबदारी तुमच्यावर सोपवत आहे, असे सांगितले.पाथरी येथील साईबाबा विकास आराखड्याच्या संदर्भात, उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्टपणे सांगितले की,भूसंपादनाची प्रक्रिया चालू द्या, पण नवीन आराखड्याप्रमाणे कामे केली जावीत, तसेच प्रत्यक्ष विकासकामे सुरू करण्यास स्थगिती देत आहे.पुढील महिन्यात, पुणे येथील विकासक आणि सल्लागारांची टीम पाथरी येथे पाठविण्याचे त्यांनी सांगितले आणि आ. राजेश विटेकर यांना नवीन, भव्य आराखडा तयार करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे निर्देश दिले.



हिंदू मुस्लिम ऐक्य दाखवून दहशत वादाला उत्तर देऊ–ॲड.सुरेंद्र खर्डे पाटील

कोल्हार । प्रतिनिधी

जम्मू-काश्मीरमधील पहेलगाम येथील पाकिस्तानी दहशतवाद्यांचा भ्याड हल्ला आणि त्यात २८ निरपराध हिंदू पर्यटकांचा मृत्यू याला विरोध करत कोल्हार येथे व्यापारी आणि सर्वधर्मीय निषेध सभा आयोजित करण्यात आली. यावेळी माजी सरपंच ड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी भाजप सरकारचा चांगला समाचार घेतला.ते म्हणाले, गेल्या अकरा वर्षांत सरकार असूनही दर सहा महिने किंवा एक वर्षाने अतिरेकी हल्ले होत आहेत. हे गुप्तचर यंत्रणेचे मोठे अपयश आहे. त्यांनी राजकारण किंवा धर्मविरोधाच्या वादात न अडकता, हिंदू-मुस्लिम ऐक्य दाखवून दहशतवादाला सडेतोड उत्तर देण्याचे आवाहन केले.सामाजिक सलोखा आणि समृद्धीच्या दृष्टिकोनातून त्यांनी नागरिकांना सोशल मीडियावर शहानिशा न करता कोणतेही मेसेज व्हायरल न करण्याचे सांगितले. यासोबतच, मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना शहिदांचा दर्जा देण्याची विनंती केली आणि त्यांच्या कुटुंबीयांकडे संवेदना व्यक्त केली.

पद्मश्री विखे पाटील कारखान्याचे संचालक स्वप्निल निबे यांनी पाकिस्तानमधून न येणारा धोका, तर आपल्यातील गद्दारांमधून असतो, असे म्हटले आणि नागरिकांना जागरूक राहण्याचे आवाहन केले.कोल्हारचे ज्येष्ठ नागरिक इलियास भाई शेख यांनी पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांना भारत सरकारकडून धडा शिकवण्याची आवश्यकता व्यक्त केली, तसेच खोट्या अफवांवर विश्वास ठेवू नये, हे स्पष्टपणे सांगितले.व्यापारी पतसंस्थेचे अध्यक्ष संजय शिंगवी, शिवसेना उपप्रमुख अनिल बांगरे, आणि अन्य मान्यवरांनीही या हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध केला. सर्वांनी एकत्र येऊन हिंदू-मुस्लिम ऐक्य दाखवून या अतिरेक्यांच्या डावांचा सामना करण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी कोल्हार भगवतीपुर ग्रामस्थ आणि व्यापाऱ्यांच्या वतीने लोणी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक देवराम वनवे यांना त्वरित चौकशी करून प्रतिबंधात्मक पावले उचलण्याची मागणी केली.



विध्यमान आमदारांनी करमाळा तालुक्याची आमसभा घ्यावी–घोलप

सोलापूर । प्रतिनिधी

मनसे तालुकाध्यक्ष संजय (बापु) घोलप यांनी करमाळा तालुक्यातील आमसभा आमदार नारायण (आबा) पाटील यांनी लवकरात लवकर घेण्याची मागणी केली आहे. त्यानुसार, करमाळा तालुक्यात गेल्या १५ वर्षांपासून आमसभा झालेली नाही आणि गेल्या पाच वर्षांपासून ही मागणी प्रलंबित आहे. करमाळा तालुक्यातील शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध समस्यांना वाचा फोडून, त्यांचे काम शासकीय कार्यालयांमध्ये अडचणींना सामोरे जात आहेत. त्याचबरोबर, त्यांना या समस्यांवर मोकळेपणाने चर्चा करण्यासाठी आणि त्यांच्या कामाला गती देण्यासाठी आमसभेची अत्यंत आवश्यकता आहे.



मनसे करमाळा च्या वतीने घोलप यांनी म्हटले की, प्रत्येक नागरिकाला त्यांच्या अधिकारांचा व कामाचा जाब विचारण्याची संधी मिळाली पाहिजे, आणि हे सर्वसामान्य नागरिकांना मिळावे यासाठी आमसभा अनिवार्य आहे. तथापि, गेल्या १५ वर्षांपासून करमाळा तालुक्यात आमसभा घेतली गेली नाही.त्यामुळे नागरिकांची अपेक्षा आहे की, आमदार नारायण (आबा) पाटील यांच्याकडून लवकरच एक आमसभा घेण्यात येईल, ज्यामुळे लोकांच्या समस्यांना वाचा फोडली जाईल आणि प्रलंबित कामांवर गती येईल.

संपूर्ण जीवन शंकर महाराजांच्या भक्तीत अर्पण करणारे माधव बाबा

अहिल्यानगर । वजीर शेख

दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती... या ओळींप्रमाणे पाथर्डीच्या पवित्र भूमीवर सद्गुरू श्री माधव बाबा यांच्या वाढदिवसानिमित्त संतोषजी जिरेसाळ मित्रमंडळ व मित्रपरिवाराने अभिष्टचिंतन केले.

परम पूज्य श्री माधव बाबा हे श्री शंकर महाराजांच्या कार्याचा दिव्य वारसा पाथर्डी परिसरात पोहोचवणारे एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व. पाथर्डीकरांना साधारणत: २००८ साली माधव बाबांच्या आगमनानंतरच धनकवडी, पुणे येथे समाधिस्त असलेल्या श्री शंकर महाराजांचा परिचय झाला. आज पाथर्डीतील प्रत्येक घरात, दुकानी, कार्यालयात श्री शंकर महाराजांची प्रतिमा श्रद्धेने विराजमान आहे आणि या कार्याचा पूर्ण श्रेय माधव बाबांना दिले जाते.माधव बाबा यांचे व श्री शंकर महाराज यांचे अद्भुत साक्षात्कार पावा गड येथे झाला. एक अजानबाहू संत म्हणून तीन दिवस माधव बाबांसोबत विहरताना त्यांना जेव्हा धनकवडी समाधीस्थळाचा दृष्टांत झाला, तेव्हा तेथे जाऊन श्री शंकर महाराजांचा दर्शनानुभव घेतल्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण जीवन श्री महाराजांच्या चरणी अर्पण केले.पाथर्डीतील कासार गल्ली येथे छोट्याशा खोलीत श्री महाराजांची प्रतिमा स्थापून माधव बाबांनी भक्तीचा केंद्रबिंदू निर्माण केला. स्वत: काहीही न मागता, कोणतीही दक्षिणा स्वीकारल्याशिवाय केवळ श्री महाराजांच्या भक्तीचा प्रसार करीत रहाणे हा त्यांचा जीवनमार्ग राहिला. त्यांच्या साधेपणाने, निर्मलतेने आणि श्रद्धेने आज पाथर्डी परिसरात भक्तीचा एक नवा झरा वाहतो आहे.



मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण व डॉ.अण्णा भाऊ साठेंना भारतरत्न देण्याची मागणी

आमदार करण देवतळेंना निवेदन सादर

वरोरा । प्रतिनिधी

मातंग समाज संघटनेच्या वतीने अनुसूचित जाती प्रवर्गात अबकड वर्गीकरण करून मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळावे तसेच साहित्यसम्राट लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर करावा, या दोन महत्त्वाच्या मागण्यांसाठी आमदार करण संजय देवतळे यांना निवेदन सादर करण्यात आले.

संघटनेचे चंद्रपूर जिल्हा जेष्ठ नेते राजु येले व युवा नेते खुशाल आदेश बावणे यांच्या नेतृत्वात संघटनेच्या शिष्ट मंडळाच्या वतीने आमदारांना निवेदन देऊन दोन्ही मागण्यांबाबत तातडीने शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी करण्यात आली.

संघटनेच्या वतीने सांगण्यात आले की, सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती आणि जमातीमध्ये उपवर्गीकरण करण्यास मान्यता दिली आहे. मात्र आजही मातंग समाज आणि त्यांच्या पोटजाती शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या प्रगतीपासून वंचित आहेत. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गात अबकड वर्गीकरण करून मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण देणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.



तसेच साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अभूतपूर्व योगदान देणाऱ्या डॉ. अण्णाभाऊ साठेंना भारतरत्न हा देशातील सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करावा, अशी मागणीही करण्यात आली. डॉ. साठे यांनी दलित, शोषित, वंचित घटकांना आवाज दिला असून त्यांच्या साहित्य आणि संघर्षमय जीवनाचा सन्मान म्हणून त्यांना भारतरत्न मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.या मागण्या मान्य न झाल्यास मातंग समाज संघटनेच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

प्रमुख मुद्दे

- अनुसूचित जातींमध्ये अबकड वर्गीकरणाची मागणी
- मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षणाची गरज अधोरेखित
- डॉ. अण्णाभाऊ साठेंना भारतरत्न देण्याची मागणी
- मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

मळगंगा देवीच्या घागर मिरवणुकीस लाखोंचा जनसागर

फुलांचा वर्षाव अन् भक्तीरसात न्हालं निघोज

शिरूर । रमेश बनसोडे

राज्यातील जागृत देवस्थानांपैकी एक असलेल्या निघोजच्या मळगंगा देवीच्या घागर मिरवणुकीला आज लाखो भाविकांचा महासागर उसळला. सकाळपासूनच निघोजमध्ये भक्तिरसाची उधळण सुरू झाली. देवीच्या जयघोषाने आसमंत दुमदुमला आणि फुलांच्या वर्षावात संपूर्ण गाव भक्तीमय वातावरणात न्हालं.

सकाळी सात वाजता भाविकांनी देवीच्या दर्शनाने दिवसाची सुरुवात केली. साडेसात वाजता संतोष गायखे यांच्या हस्ते देवीच्या घागरीची पूजा करून मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला. महिलांचा लक्षणीय सहभाग हे मिरवणुकीचं खास वैशिष्ट्य ठरलं. शेकडो महिलांनी पितळी आणि विविध धातूच्या कळशा डोक्यावर घेत, भक्तिगीत गात आनंदाने सहभाग नोंदवला.मुख्य पेठेतील प्रत्येक गच्ची, दरवाजा, माळवा, गॅलरी भाविकांनी फुलून गेली होती. 'जय मळगंगा माते'च्या जयघोषाने संपूर्ण निघोज गाव दुमदुमलं. यंदा पहिल्यांदाच ड्रोनच्या माध्यमातून देवीच्या घागरीवर आणि मंदिरावर फुलांचा वर्षाव करण्यात आला. आकाशातून उधळलेल्या फुलांच्या वर्षावाने अविस्मरणीय दृश्य पाहायला मिळालं.



मिरवणूक जुनी पेठेतून देवीच्या मंदिरात पोहोचल्यावर पुजारी संध्या गायखे, सुवर्णा गायखे, सारिका गायखे आणि रुपालीताई गायखे यांच्या हस्ते घागरीचे औक्षण झाले. टाळ्यांच्या कडकडाटात व जयजयकारात ही विधी पार पडली. त्यानंतर घागर बारवेत विसर्जित झाली. यानंतर गावाच्या प्रमुख चौकातून ८५ फूट उंच काठी व पालखी मिरवणूक निघाली. त्यानंतर जगप्रसिद्ध रांजणखळग्याच्या कुंड यात्रेला भव्य सुरुवात झाली. कुंड परिसरात पारंपरिक खेळणी, शेती साहित्य व मिठाई विक्रेत्यांनी यात्रेला रंगत आणली.यात्रेच्या दरम्यान सवाष्णींनी देवीला पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण केला आणि गुळाचा प्रसाद वाटण्यात आला. पारंपरिक कुस्त्यांच्या हगाम्याला हजारोंच्या उपस्थितीत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.पोलीस, आरोग्य, वीज व पाणीपुरवठा विभागाच्या उत्कृष्ट व्यवस्थेमुळे यात्रेकरूंना कोणतीही अडचण जाणवली नाही. ग्रामपंचायतीने २४ तास पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून भाविकांचे समाधान वाढवले.खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते सर यांच्यासह अनेक मान्यवरांनी देवीच्या दर्शनाचा लाभ घेतला. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने दर्शन रांग व्यवस्थापन उत्तमरीत्या पार पाडले.या पारंपरिक यात्रेने श्रद्धा, संस्कृती व एकतेचे दर्शन घडवत निघोज गावाचा लौकिक आणखी वृद्धिंगत केला. मळगंगा मातेच्या आशीर्वादाने लाखो भाविकांच्या मनात भक्तिरसाचा अविरत प्रवाह सुरू झाला.

'सह्याद्रीचा राखणदार' चे माळशिरस तालुका प्रतिनिधी श्रीकृष्ण देशपांडे यांना

पत्रकार सुरक्षा समितीचा राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

सोलापूर । प्रतिनिधी

राज्यातील पत्रकारांच्या हक्कासाठी सातत्याने लढा देणाऱ्या पत्रकार सुरक्षा समितीने यंदाचा राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५ 'सह्याद्रीचा राखणदार' माळशिरस तालुका प्रतिनिधी श्रीकृष्ण देशपांडे यांना जाहीर केला आहे. ही माहिती पत्रकार सुरक्षा समितीचे प्रदेशाध्यक्ष यशवंत पवार यांनी दिली.

गेल्या आठ वर्षांपासून पत्रकार सुरक्षा समिती महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी विविध स्वरूपाच्या आंदोलने, निवेदने आणि शासनाशी पत्रव्यवहार करत पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. पत्रकारांसाठी समान पेन्शन योजना, विमा योजना, आरोग्य योजना, घरकुल योजना, शासन दरबारी पत्रकारांची नोंदणी, यूट्यूब व पोर्टल माध्यमांना शासकीय मान्यता, तसेच पत्रकारांवरील हल्ल्यांवर आक्रमक भूमिका या मुद्द्यांसाठी समितीने ठोस पाठपुरावा केला आहे. त्याचप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपत समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा दरवर्षी सत्कार करण्यात येतो.माळशिरस तालुक्यातील नेवरे गावचे रहिवासी श्रीकृष्ण देशपांडे यांनी पत्रकारितेला व्यवसाय न मानता समाजसेवेचा ध्यास म्हणून स्वीकारले आहे. दैनिक सह्याद्रीचा राखणदार च्या माध्यमांतून त्यांनी वंचित, पीडित घटकांच्या हक्कांसाठी प्रशासन दरबारी ठामपणे आवाज उठवला आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय घडामोडींचा वेगवान आणि परिणामकारक आढावा घेत त्यांनी पत्रकारीतेत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या बातम्यांमुळे अनेकांना न्याय मिळाल्याचे उदाहरणे समोर आली आहेत.



पत्रकारिता हा समाजाचा आरसा असून या भूमिकेचे भान ठेवत केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन पत्रकार सुरक्षा समितीने त्यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५ जाहीर केला आहे.

वैजापूरात सरकारी रुग्णालय 'राम भरोसे'

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उघड



वैजापूर । अर्जुन शिंदे

तालुक्यातील लाडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे रुग्णालयाचा कारभार अक्षरशः रामभरोसे चालतो आहे. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे उपचाराविना रुग्णांना परतण्याची वेळ आल्याने संतापाचे वातावरण पसरले आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना तात्काळ प्राथमिक उपचार मिळावेत म्हणून लाडगाव, मनूर, बोरसर, गाडेपिंपळगाव, शिऊर व लोणी येथे लाखो रुपयांचा खर्च करून प्राथमिक आरोग्य केंद्रे उभारण्यात आली. मात्र, गेल्या काही दिवसांपासून येथे डॉक्टर न राहिल्याने आरोग्य सेवा ठप्प झाली आहे.

शुक्रवारी (दि. २५) लाडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर अनुपस्थित असल्याचे प्रकार समोर आला. एका रुग्णाच्या नातेवाईकांनी संपर्क साधल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्वतः घरी असल्याचे सांगितले, तर दुसरे अधिकारी लग्न समारंभासाठी गेले असल्याचे सांगण्यात आले. परिणामी, उपचाराविना रुग्णांना माघारी फिरावे लागले. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, अनेक डॉक्टर स्वतःच्या खाजगी दवाखान्यांवर अधिक लक्ष देतात आणि सरकारी रुग्णालये दुर्लक्षित करतात. मुख्यालयात न राहता रेल्वेच्या वेळापत्रकाप्रमाणे हजेरी लावण्याचा प्रकार सर्रास सुरु आहे. तरीही तालुका आरोग्य अधिकारी याकडे दुर्लक्ष करतात, याबाबत संताप व्यक्त होत आहे.

तालुक्यातील सहाही प्राथमिक आरोग्य केंद्रात असाच प्रकार सुरु असून आरोग्य यंत्रणेची स्थिती गंभीर बनली आहे. डॉक्टरांच्या गैरहजेरीमुळे रुग्णांना भटकंती करावी लागत असून, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

रुग्णालय 'राम भरोसे'

लाडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी, औषधनिर्माण अधिकारी, दोन परिचारिका व एक शिपाई कार्यरत आहेत. किमान एक वैद्यकीय अधिकारी नेहमी उपस्थित असणे गरजेचे असताना, रुग्णालयात डॉक्टरच नसल्याचे वास्तव समोर आल्याने रुग्णालयाचा कारभार रामभरोसे असल्याचे ठळकपणे दिसून आले.

मुख्यालयात न राहणाऱ्या डॉक्टरां विरोधात कारवाईची मागणी

ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टरांच्या मुख्यालयात अनुपस्थितीचा प्रकार नित्याचा झाला आहे. अनेक डॉक्टरांनी खाजगी दवाखान्यांकडे अधिक लक्ष दिल्यामुळे सरकारी रुग्णालयांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे अशा डॉक्टरांवर तातडीने शिस्तभंगात्मक कारवाई करून ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला गती देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

नीरा–भीमा कारखान्याच्या अध्यक्षपदी भाग्यश्री पाटील;उपाध्यक्षपदी दादासाहेब घोगरे

हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीत बिनविरोध निवड

भिगवण । प्रतिनिधी

शहाजीनगर (ता. इंदापूर) येथील नीरा–भीमा सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी भाग्यश्री हर्षवर्धन पाटील यांची तर उपाध्यक्षपदी दादासाहेब उत्तम घोगरे यांची बिनविरोध निवड सोमवारी (दि. २८) झाल्याची घोषणा कारखान्याच्या संचालक मंडळाच्या बैठकीत करण्यात आली.कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक संस्थापक व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच बिनविरोध पार पडली. राज्यातील सलग पाच पंचवार्षिक निवडणुका बिनविरोध पार पडणारा नीरा–भीमा हा एकमेव कारखाना ठरला आहे. नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी शहाजी सभागृहात झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत उपजिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी कल्याण पांढरे यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पार पडली. अध्यक्षपदासाठी भाग्यश्री पाटील व उपाध्यक्षपदासाठी दादासाहेब घोगरे यांचे अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.भाग्यश्री पाटील गेली २० वर्षे नीरा–भीमा कारखान्यात संचालिका म्हणून कार्यरत असून अनेक सहकारी संस्थांवरही कार्यरत आहेत. राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांचा तीन दशकांचा सक्रिय सहभाग आहे.या निवडीनंतर संस्थापक हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीत नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी मावळते अध्यक्ष लालासाहेब पवार यांचे आणि माजी उपाध्यक्ष व संचालक मंडळाचे विशेष आभार मानले. नूतन अध्यक्षा भाग्यश्री पाटील व उपाध्यक्ष दादासाहेब घोगरे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.बैठकीस अंकिता पाटील ठाकरे, संस्थापक संचालकांसह लालासाहेब पवार, विलासराव वाघमोडे, ॲड. कृष्णाजी देवकर, दत्तू सवासे, प्रतापराव पाटील, प्रकाश मोहिते, संजय बोडके, राजकुमार जाधव, विजय घोगरे, सुभाष गायकवाड, राजेंद्र देवकर, उमेश पाटील, महेशकुमार शिर्के, आनंदराव बोंद्रे, रामचंद्र नाईक, राहुल कांबळे, संगीता पोळ, कल्पना शिंदे आदी संचालक उपस्थित होते. आभार कार्यकारी संचालक एन. ए. सपकाळ यांनी मानले.



नीरा–भीमाचा भविष्यकाळ उज्ज्वल – हर्षवर्धन पाटील

हर्षवर्धन पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले, कारखाना स्थापनेपासून शेतकऱ्यांचा विश्वास जपत कारखाना मोठा झाला आहे. उर्वरित शेतकरी सभासदांचे पेमेंट लवकरच अदा केले जाईल. आगामी पाच वर्षांत कठोर निर्णय व नियोजनाद्वारे कारखान्याची स्थिती सुधारली जाईल. नीरा–भीमाचा भविष्यकाळ नक्कीच उज्ज्वल असेल आणि कारखाना राज्यातील अग्रगण्य कारखान्यांमध्ये स्थान मिळवेल.

गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेचा चिकटगाव येथे शुभारंभ



वैजापूर । अर्जुन शिंदे

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ चिकटगाव येथे आमदार प्रा. रमेश पांडुरंग बोरनारे यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून संपन्न झाला.

प्रा. रमेश बोरनारे यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर झालेल्या पहिल्या टप्प्यात वैजापूर मतदारसंघातील १४ गावांतील २२ धरणांना मंजुरी मिळाली आहे. योजनेच्या माध्यमातून धरणातील जलसाठा वाढवून टिकाऊ जलव्यवस्थापन साधले जाणार आहे. तसेच, गाळयुक्त शिवार उपक्रमामुळे जमिनीची सुपीकता वाढवून शेती उत्पादनातही लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या वेळी आमदार बोरनारे यांनी सांगितले की, सिंचन व पिण्याच्या पाण्याच्या समस्येच्या निराकरणासाठी शासनाने मराठवाडा ग्रीड योजना राबविण्याचे धोरण स्वीकारले असून, लवकरच या योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मार्गी लागेल. गाव पातळीवर शेतकऱ्यांनी नाला खोलीकरण, गाळमुक्त धरण व सिमेंट बंधाऱ्यांचे काम हाती घेऊन जलसंधारणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.कार्यक्रमास माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर, माजी सभापती भागिनाथ दादा मगर, डॉ. राजीव डोंगरे, संचालक गोरख आहेर, उपतालुकाप्रमुख प्रकाश वाघ, राजेंद्र निकम चिकटगावकर, उत्तम निकम, माजी उपसभापती आनंद निकम, उपविभागप्रमुख अरुण मगर, प्रशांत शिंदे, गणेश आहेर, दीपक वाघ, गजानन निकम, संजय कुंदे, समाधान सूर्यवंशी, भाऊसाहेब निकम, पुंजारी पाटील बढे, बि.के. जाधव, राधाकृष्ण सोनवणे, चांगदेव निकम, बाबासाहेब तात्या सोनवणे खरजकर, गोटू नाना, कैलास पाटील (बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष), अर्जुन जाधव, योगेश हिरे, अरुण सोनवणे, ज्ञानेश्वर तांबे, किशोर मगर, किरण निकम यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, सदस्य, प्रगत शेतकरी व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत शिंदे यांनी, प्रास्ताविक अरुण सोनवणे यांनी तर आभार प्रदर्शन उत्तम निकम यांनी केले.

'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्वत:ला कधीही कमजोर समजू नये'–पद्माकर खोडे यांचे मार्गदर्शन

सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी

बाबासाहेब आंबेडकर आदर्श जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा, चाणकी येथे नव्याने बांधलेल्या वर्गखोल्यांचे उद्घाटन आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी गटशिक्षणाधिकारी जयपाल राऊत यांच्या अध्यक्षतेखाली आणि शिक्षण विस्तार अधिकारी पद्माकर खोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.पद्माकर खोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''ग्रामीण भागातील विद्यार्थीही प्रचंड क्षमता बाळगतात. त्यांनी स्वतःला कधीही कमजोर समजू नये आणि आत्मविश्वासाने पुढे जावे''. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहावे, असेही ते म्हणाले.कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुण्यांमध्ये शिक्षण विस्तार अधिकारी संगीता महाकाळकर, अर्चना पुरेड्डीवार, नितीन खैरकार तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा पायल काळबांडे, माजी सरपंच संध्या लुंगे, ग्रा. पं. सदस्य पंढरीनाथ राऊत व इतर मान्यवरांचा समावेश होता.पद्माकर खोडे यांच्या शिक्षण विस्तार अधिकारी पदावरील पदोन्नतीनिमित्त त्यांच्यासह त्यांच्या पत्नी सौ. अनिता खोडे यांचा सत्कार शाळेतील शिक्षक व गावकऱ्यांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. गटशिक्षणाधिकारी जयपाल राऊत आणि त्यांच्या पत्नी यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला.या सोहळ्यात नवोदय प्रवेश परीक्षेत यश मिळवलेल्या लोकेश शारदा राम प्रभू विखे याचा आणि त्याच्या पालकांचा देखील सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका देवकी दळवी यांनी केले. संचालन गोविंद माने व शाळेतील विद्यार्थ्यांनी केले, तर आभार प्रदर्शन देवकी दळवी यांनी केले. समारोप गीत गावंडे सर यांनी गाऊन वातावरण अधिक मंगलमय केले.या कार्यक्रमासाठी केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या यशस्वी आयोजनात नीलिमा थुल, प्रतिभा नागदेवते, गजानन वानखेडे, वामन लुंगे, गणेश कुंबरे, मनीषा पोकळे यांसह अनेक शिक्षकांनी सहकार्य केले.



मोहोळ तालुक्यात वादळी वाऱ्याने आंबा पिकाचे मोठे नुकसान

मोहोळ । प्रतिनिधी

मोहोळ तालुक्यातील नरखेड तसेच देगाव, वाळूज, डिकसळ, मसले चौधरी, एकुरके, बोपले, भोयरे, हिंगणी आदी भागात शुक्रवारी व शनिवारी रात्री वादळी वाऱ्यामुळे आंबा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

शुक्रवारी व शनिवारी रात्री अचानक वातावरणात बदल होऊन जोरदार वादळी वारे सुटले. काही काळ रिमझिम पावसानेही हजेरी लावली. या वादळामुळे देगाव (ता. मोहोळ) येथील विजयकुमार पोतदार यांच्या पाच एकर आंबा बागेतील मोठ्या प्रमाणात फळे झाडांवरून गळून पडल्याने सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.याशिवाय, शेतांमध्ये साठवलेला मोकळा कडबा उडून गेला तसेच वस्तीवरील पत्र्यांचेही नुकसान झाले. परिणामी शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे झालेल्या या नुकसानीची शासनाने तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस १४ एप्रिल हाच सर्वात मोठा शुभमुहूर्त–प्रदीप वाघ

जितेंद्र मोरघा । मोखाडा

मोखाडा तालुक्यातील शिरसगाव येथे आयोजित संयुक्त जयंती कार्यक्रमात बोलताना माजी सभापती तथा आदिवासी विकास हक्क संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी सांगितले की, साडेतीन शुभमुहूर्त असतात, परंतु माझ्या दृष्टीने खरा शुभमुहूर्त म्हणजे १४ एप्रिल. कारण याच दिवशी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. त्यांच्या मुळे माझ्यासारख्या सामान्य माणसाला किंमत मिळाली आणि जगण्याचा अधिकार प्राप्त झाला.

प्रदीप वाघ पुढे म्हणाले, कालच यूपीएससी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यात आदिवासी समाजातील जव्हार तालुक्यातील अजय डोके, एका मेंढपाळाचा मुलगा बिरदेव ढोणे आणि एका मुस्लिम समाजातील मुलगी यशस्वी झाली. हे सर्व केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षामुळे शक्य झाले आहे. विद्येचा अधिकार नसलेल्या समाजातील एकलव्याच्या दोन्ही हातांना आज सराव मिळाला आहे. आता कितीही अंगठे कपटाने कापले तरी आम्ही थांबणार नाही. या कार्यक्रमाचे आयोजन पंचशील महिला बचत गट व रमाई महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमास डॉ. चंद्रमुखी मोहीते, माजी सभापती प्रदीप वाघ, ईश्वर गांगुर्डे, ज्ञानेश्वर पालवे, दीपक कडलग, रघुनाथ गांगुर्डे, मनोज गांगुर्डे, रवि धिंडा, देवचंद जाधव, नंदकुमार वाघ, संजय वाघ यांच्यासह मोखाडा तालुका तसेच जव्हार, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, शहापूर तालुक्यांतील समाजबांधव आणि शिरसगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते



अपघातग्रस्त महिलेला खासदार डॉ.हेमंत सवरा यांची तातडीने मदत

माणुसकीचा अनोखा आदर्श, नागरिकांतून कौतुकाचा वर्षाव

पालघर । जितेंद्र मोरघा

पालघर जिल्ह्याचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी शनिवारी माणुसकीचा अत्युच्च आदर्श उभा करत सर्वांचे मन जिंकले. एका शैक्षणिक कार्यक्रमानंतर मनोरमार्गे जव्हारकडे जात असताना कोसबाड परिसरात त्यांना दुचाकी अपघाताची घटना दिसली. रस्त्यावर गंभीर जखमी झालेली महिला पाहताच डॉ. सवरांनी क्षणाचाही विलंब न करता आपली गाडी थांबवली आणि थेट घटनास्थळी धाव घेतली. महिलेच्या पायाला गंभीर दुखापत झाली होती आणि परिसरात गोंधळाचे वातावरण होते. डॉ. सवरांनी आपल्या वैद्यकीय शिक्षणाचा उपयोग करून शांतपणे प्राथमिक उपचार केले. रक्तस्राव थांबवून महिलेची प्रकृती अधिक बिघडू नये यासाठी तातडीची काळजी घेतली. त्यानंतर त्वरित रुग्णवाहिकेची व्यवस्था करून जखमी महिलेला रुग्णालयात रवाना करण्यात आले.

आपला शासकीय कार्यक्रम बाजूला ठेवत डॉ. सवरांनी मानवतेचे व संवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण घडविले. त्यांच्या या तत्परतेमुळे खासदार असावा तर असा! अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

कोणताही कार्यक्रम किंवा पद माणुसकीच्या मूल्यांपेक्षा मोठा नाही,असे सांगत डॉ. सवरा यांनी लोकसेवेचा खरा अर्थ प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला.



अर्चना घुगे–खाडे यांना 'सर फाउंडेशन'चा जिल्हा नारी शक्ती सन्मान पुरस्कार जाहीर

मोहोळ । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिखली (ता. मोहोळ) येथील सहशिक्षिका अर्चना जालिंदर घुगे–खाडे यांना 'सर फाउंडेशन'चा या वर्षीचा जिल्हास्तर नारी शक्ती सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे. सर फाउंडेशनचे राज्य समन्वयक सिद्धाराम माशाळे, बाळासाहेब वाघ आणि हेमा शिंदे यांनी निवडीचे पत्र देऊन हा पुरस्कार जाहीर केला.



अर्चना घुगे–खाडे या एक प्रयोगशील, कृतीशील आणि अभ्यासू शिक्षिका असून टॅलेंट हंट शिष्यवृत्ती परीक्षा, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांमध्ये त्यांचा हातखंडा आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विकास साध्य करण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.या पुरस्काराचे वितरण येत्या रविवारी (४ मे) रोजी श्री शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मान्यवर व्यक्तींच्या हस्ते करण्यात येणार आहे.या निवडीबद्दल अर्चना घुगे–खाडे यांचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, गटशिक्षणाधिकारी अविचल महाडीक, शिक्षणविस्तार अधिकारी विकास यादव, बंडू शिंदे, मल्लिनाथ स्वामी, केंद्रप्रमुख ऋषी जगताप, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा चंद्रकला सिरसट, उपाध्यक्ष श्रीनिवास यादव, मुख्याध्यापक विष्णू दाढे तसेच सर्व शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

पहलगाम हल्ल्याचा देवळीत तीव्र निषेध शहर बंद आणि मोर्चा काढून संताप व्यक्त

तहसीलदार मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

देवळी । प्रतिनिधी

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे घडलेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात २८ हिंदू भाविकांची क्रूर हत्या करण्यात आली. या हत्याकांडाचा निषेध व्यक्त करत सोमवारी देवळी शहरात सर्वपक्षीय संघटनांच्या वतीने मोर्चा काढण्यात आला आणि दुपारपर्यंत शहर बंद ठेवण्यात आले.गांधी चौक येथून मोर्चाला सुरुवात झाली. या निषेध मोर्चाचे नेतृत्व आमदार राजेश बकाने यांनी केले. मोर्चात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, शिवसेना (उद्धव गट व शिंदे गट), युवा संघर्ष मोर्चा, व्यापारी संघटना, तसेच विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी आमदार बकाने म्हणाले, आमचे सरकार हे दहशतवाद सहन करणार नाही. हल्लेखोरांना शोधून





काढून कठोरातील कठोर शिक्षा केली जाईल. त्यांनी पीडित कुटुंबांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या.

मोर्चानंतर तहसीलदार देवळी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी वर्धा यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात खालील मागण्या करण्यात आल्या:

मोर्चात प्रमुख उपस्थितीत भाजपच्या शोभा तडस, विलास जोशी, नरेंद्र मदनकर, राहुल चोपडा, रवी कारोटकर, शुभांगी कूर्जेकर, रितेश लोखंडे, काँग्रेसचे सुरेश वैद्य, मोरेश्वर खोडके, अजय देशमुख, अय्यूब पटेल, शिवसेनेचे निलेश तिडके, सुहास कुरटकर, निलेश मोटघरे, बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेचे मोहन जोशी, दिनेश शिरसागर, युवा संघर्ष मोर्चाचे किरण ठाकरे, प्रवीण कात्रे तसेच व्यापारी संघटनेचे अशोक पवार, राजू शेठीया, एक पाळा हनुमान देवस्थान, ज्येष्ठ नागरिक संघटना व असंख्य देवळीकर नागरिक सहभागी झाले होते. दुपारीपर्यंत देवळी शहर बंद पाळण्यात आले. या मोर्चा आणि बंदच्या माध्यमातून देवळीकरांनी एकजुटीने आपल्या भावना व्यक्त करत दहशतवादाविरुद्ध रोष व्यक्त `केले

हल्ल्यात सामील दहशतवाद्यांचा शोध घेऊन त्यांना मृत्युदंड देण्यात यावा.
जम्मू-काश्मीरमध्ये हिंदू पर्यटकांसाठी सुरक्षेची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी.
मृतकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व एकाला शासकीय नोकरी दिली जावी.
धार्मिक स्थळे व यात्रांच्या सुरक्षेसाठी एकत्रित राष्ट्रीय सुरक्षा धोरण तयार करण्यात यावे.
धार्मिक कारणावरून झालेल्या हिंसाचारास राष्ट्रद्रोह समजून कठोर कारवाई करण्यात यावी.
देशातील मदरसांवर नियंत्रण ठेवून, दहशतवादी प्रशिक्षणास प्रतिबंध घालण्यात यावा.

राष्ट्रसंत सेना महाराज यांची ७२५ वी जयंती उत्साहात साजरी

राष्ट्रीय नाभिक संघटनेतर्फे सिंदखेडराजा येथे कार्यक्रम

सिंदखेडराजा । प्रतिनिधी

राष्ट्रीय नाभिक संघटनेच्या वतीने २५ एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रसंत सेना महाराज यांची ७२५ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. शीख धर्माच्या 'गुरु ग्रंथसाहिब' मध्ये सेना महाराजांच्या अभंगांचा समावेश असून, परिवर्तनवादी, विज्ञानवादी विचारांचे आणि संघर्षशील जीवन जगलेल्या या थोर वारकरी संताच्या स्मरणार्थ विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात सेना महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून माळार्पण करण्यात आले. सेनाजींनी स्वाभिमान, भीमत्व आणि सर्जनशीलतेचा संदेश दिल्याने अनेक विविध समाजघटकांचे



प्रतिनिधी त्यांच्या विचारांशी एकरूप झाले. या वेळी राष्ट्रीय नाभिक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष हरिदास जाधव, जिल्हा मुख्य सचिव डॉ. प्रकाश सवडतकर, तालुका अध्यक्ष विलास चित्रे, शहर अध्यक्ष प्रदीप जाधव, तसेच गजानन राऊत, शिवानंद वैद्य, विष्णू वैद्य, राम राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

दहेगाव रेल्वे यार्डात वीजपुरवठा खंडित तरुणांनी पाणी पुरवठा करत प्रवाशांना दिलासा

दहेगाव । प्रतिनिधी

पुलगाव-नागपूर रेल्वे मंडळाच्या वर्धा विभागातील दहेगाव रेल्वे स्टेशन यार्डात ओएचई (ओव्हरहेड इक्विपमेंट) मध्ये बिघाड झाल्याने रेल्वे वीजपुरवठा पूर्णतः खंडित झाला आणि अनेक प्रवासी गाड्यांची चाके थांबली. सुमारे १२० किमी प्रतितास वेगाने धावणाऱ्या गाड्यांना अचानक थांबावे लागल्याने प्रवाशांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अमरावतीहून जबलपूरला जाणारी एक प्रवासी गाडी कवठा स्टेशनवर तर बिलासपूरच्या दिशेने जाणारी दुसरी गाडी पुलगाव स्टेशनवर सुमारे तीन तासांपर्यंत उभी राहिली. प्रखर उन्हामुळे पाण्याची टंचाई जाणवू लागली आणि प्रवासी अस्वस्थ झाले.

यावेळी पुलगाव येथील युवा समाजसेवक पवन मारोठिया, राहुल काळे, गौरव दांडेकर, रुपेश जोशी आणि उमेश राळेकर यांनी पुढाकार



घेत रेल्वे प्रशासनासोबत समन्वय साधला आणि ट्रेनमध्ये थांबलेल्या प्रवाशांना मोफत चहा व पाणी पुरवठा केला. या मदतीमुळे प्रवाशांनी या तरुणांना देवदूत म्हणून गौरविले आणि त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. माणुसकी आजही जिवंत आहे, असे उद्गार अनेक प्रवाशांनी यावेळी काढले.

दरम्यान, कवठा रेल्वे स्टेशनवर तैनात आरपीएफ जवान अनिल यादव यांनी बंद पडलेला बोरवेल तातडीने दुरुस्त करून प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आणि आपल्या कर्तव्याची प्रामाणिकतेने पूर्तता केली.

रात्री सुमारे १०.३० वाजता वीजपुरवठा सुरळीत झाल्यानंतर अडकलेल्या गाड्या पुन्हा त्यांच्या गंतव्य स्थानांकडे मार्गस्थ झाल्या आणि प्रवाशांनी सुटकेचा श्वास घेतला.

मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालयात इंग्रजी भाषा दिवस साजरा

हिंगणघाट । प्रतिनिधी

मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट येथे इंग्रजी विभागाच्या वतीने इंग्रजी भाषा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. सपना जयस्वाल होत्या.

यावेळी डॉ. जयस्वाल यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा दिवस का साजरा केला जातो याची माहिती दिली तसेच विल्यम शेक्सपियर यांच्या साहित्य व कार्याचा थोडक्यात परिचय घडवून दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभाग



प्रमुख प्रा. संगीता लांडगे यांनी केले. त्यांनी इंग्रजी भाषेचे वाढते जागतिक महत्त्व विशद केले.

प्रा. जमीर पटेल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कोणताही विषय कठीण नसतो, तो आत्मसात करताना सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे.या कार्यक्रमात इंग्रजी विभागातर्फे पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी इंग्रजी व्याकरण विषयावर आकर्षक पोस्टर सादर करून इंग्रजी भाषेतील रुची वाढविण्याचा प्रयत्न केला. या स्पर्धेत १६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांच्या प्रयत्नांचे डॉ. सपना जयस्वाल यांच्या हस्ते कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सीमा इंगळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मीनाक्षी जीडगिलवार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कला विभागातील सर्व प्राध्यापकांनी मोलाचे सहकार्य केले.

भारत विद्यालयात 'उन्हाळी छंद शिबिर २०२५' ला उत्साही सुरुवात

हिंगणघाट । प्रतिनिधी

''मुलांना शालेय अभ्यास किंवा खेळांव्यतिरिक्तही इतर कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उन्हाळी छंद शिबिरांमुळे मिळते. ही कौशल्ये त्यांना अधिक आत्मविश्वासाने पुढे जाण्यास मदत करतात,'' असे मत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारणी सदस्य किशोर कोसुरकर यांनी व्यक्त केले.२८ एप्रिल २०२५ रोजी भारत विद्यालय, हिंगणघाट येथे 'उन्हाळी छंद शिबिर २०२५' च्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी किशोर कोसुरकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक हरीश भट्टड होते. यावेळी उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलांक्षी बुरीले, शिबिर संयोजिका शिल्पा चौधरी तसेच प्रंशात बाभुळकर, श्रीकांत राडे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.शिबिराबाबत सविस्तर माहिती उपमुख्याध्यापक किशोर चवरे यांनी प्रास्ताविकात दिली. मुख्याध्यापक हरीश भट्टड यांनी आपल्या शुभेच्छापर संदेशात विद्यार्थ्यांना शिबिरातील विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.या वर्षीच्या छंद शिबिरात कला व हस्तकला, मैदानी खेळ, योग, मातकाम, ब्लॅक पेंटिंग, गीत-संगीत, अक्षरलेखन, नृत्य आणि संगणक ज्ञान यांसारख्या विविध कौशल्यांचा समावेश करण्यात आला आहे. शिबिरात १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे.कार्यक्रमाचे संचालन कु. निकिता कामडी यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात गणेश मंत्र पठणाने तर समारोप शांती मंत्राने करण्यात आला.

धानोरा येथे निर्मिक संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

गरजू विद्यार्थीना शालेय साहित्य पुरवणे एक मानवी कर्तव्य-जया सतीश अंभोरे

धानोरा । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे आर्थिक दृष्ट्या कमकुवत असतात, त्यामुळे मुलांच्या शिक्षणापेक्षा त्यांचे लक्ष दैनंदिन गरजांवर केंद्रित होते. उदरनिर्वाहासाठी दैनंदिन रोजगार अथवा शेतीच्या कामासाठी प्राधान्य दिले जाते, ज्यामुळे मुलाच्या शिक्षणाकडे आणि आवश्यक शालेय साहित्य पुरविण्याकडे पालकांचे दुर्लक्ष होते. शालेय साहित्याचा अभाव विद्यार्थ्यांना शाळेपासून दूर ठेवतो किंवा त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये अडथळा ठरतो पुस्तके आणि लेखन साहित्य यासारख्या गोष्टी विद्यार्थ्यांना ध्यानार्जनासाठी प्रेरणा देतात आणि आत्मविश्वास वाढवतात त्यामुळे या मुलांना साहित्य पुरवणे म्हणजे त्यांच्या स्वप्नांना पंख देण्यासारखे आहे. तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवणे एक मानवी कर्तव्य सुद्धा आहे. असे प्रतिपादन निर्मिक ग्रामीण विकास व बहुउद्देशिय संस्था नागपुरच्या अध्यक्षा जया सतीश अंभोरे यांनी व्यक्त केले

ते २७ एप्रिल रोजी धानोरा या गावात निर्मिक ग्रामीण विकास बहुउद्देशिय संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्याचे वितरण सोहळ्या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुदेव सेवा मंडळाचे सदस्य ज्येष्ठ समाजसेवी हरीभाऊ मांदाडे होते, तर प्रमुख अथिती म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सतिश अंभोरे, आर्वीचे ज्येष्ठ समाजसेवी श्यामसुंदर राठी, धानोरा येथील समाजसेवी पंकज चांडक, ज्येष्ठ पत्रकार शशांक चतारे, ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, माजी प्रदेश अध्यक्ष इंजि विजय नाखले, लॉयन्स क्लबचे माजी जिल्हाध्यक्ष विजय सत्यम, स्नेहालय संस्थेचे अध्यक्ष विलास कुळकर्णी, धानोरा येथील माजी सरपंच रेखा कावडे,



भानखेडा गावाचे माजी सरपंच महेश देवडे, मुख्याध्यापक दिपक कदम पत्रकार व रोहर लिडर संतोष तुरक, पोलीस पाटील आनंद बुचे, समाजसेवी विलास वाटगुळे, हनुमान चौधरी प्रमुख्याने मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष हरीभाऊ मांदाडे म्हणाले की ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही तर एक मानवी कर्तव्य आहे. विविध संस्था आणि व्यक्तींनी पुढाकार घेऊन या मुलांच्या शिक्षणाला दिशा दिली तर त्यांचे भविष्य उज्वल होईल. समाजात सकारात्मक बदल घडेल जर प्रत्येकाने आपल्या परीने योगदान दिले तर, सर्वांसाठी शिक्षण हे स्वप्न साकार होण्यास वेळ लागणार नाही. एक छोटा पुढाकार मोठ्या बदलाची नांदी ठरु शकतो असे मत इमरान राही यांनी व्यक्त केले. यावेळी, सतिश अंभोरे, विलास कुळकर्णी आणि दिपक कदम यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाची प्रस्तावना नामदेव अखाडे, संचालन श्रध्दा संत यांनी तर आभार शशांक चतारे यांनी व्यक्त केले. १५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी निल विलास वाटगुळे, धिरज विठ्ठल लोणबले, वकु हर्षदा प्रविण मांदाडे यांनी पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करणात आले. गावकरी मंडळी मोठ्या संख्यानी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विठ्ठल क्षिरसागर, गिरधर वसाके, प्रशांत वारगुळे, महावीर जांजडा, नितीन भोयर, संजय गावंडे, धिरज वाटगुळे, विजय मोहर्ले, दिनेश निकोडे, अमोल मोहर्ले, विलास मांदाडे, सुभाष जंगठे, राजेश थोपटे, वामन चतारे, माया वाटगुळे, शोभा जांजाड, रौशनी वसाके, रेणूका वाटगुळे, बेबी मांदाडे, माया बुरांडे, रजनी वाटगुळे, नामदेव अखाडे, धनंजय खेडकर यांनी अथक परिश्रम घेतले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .